जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 OCT 2026
सकाळ

पंचगंगा प्रदूषणमुक्तीसाठी लोकचळवळ उभारा

डॉ. राजेंद्र सिंह : शिवाजी विद्यापीठात नेहरू अभ्यास केंद्रातर्फे व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : 'ग्रामीण विकास साधायचा असेल, तर पाणी, पर्यावरण आणि निसर्गसंपदेचे संवर्धन यांना सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. पश्चिम घाटाचे संरक्षण, पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखणे आणि स्थानिक पातळीवरील पाणी व पर्यावरणविषयक प्रश्न सोडविण्यासाठी समाजाने एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज आहे,' असे प्रतिपादन डॉ. राजेंद्र सिंह यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील नेहरू अभ्यास केंद्रातर्फे अर्थशास्त्र विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये गुरुवारी घेण्यात आलेल्या 'ग्रामीण विकास आणि जलव्यवस्थापन' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार होते. डॉ. राजेंद्र सिंह यांनी ग्रामीण भागातील पाणीटंचाई, जलसंधारण, नैसर्गिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि शाश्वत ग्रामीण विकास यांचे महत्त्व अधोरेखित केले. पाण्याचे नियोजन केवळ शासकीय योजनांपुरते मर्यादित न ठेवता त्यामध्ये स्थानिक नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नद्या, डोंगर, जंगल आणि जैवविविधता यांचे संरक्षण केल्याशिवाय पर्यावरणाचा समतोल राखता येणार नाही, असेही त्यांनी सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात नेहरू अभ्यास केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या व्याख्यानात बोलताना डॉ. राजेंद्र सिंह. यावेळी डावीकडून डॉ. प्रल्हाद माने, डॉ. श्रीराम पवार, डॉ. माणिकराव साळुंखे.

डॉ. पवार यांनी अध्यक्षीय मनोगतात डॉ. सिंह यांच्या विचारांचा आढावा घेत ग्रामीण विकास, जलव्यवस्थापन, पंचगंगा प्रदूषणमुक्ती आणि पश्चिम घाट संवर्धनासाठी लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. पर्यावरण संरक्षणासाठी समाजाने सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी 'पश्चिम घाट वाचवा' या विषयावरही चर्चा झाली. त्यात डॉ. साळुंखे, डॉ. जय सामंत, मधुकर बाचुळकर, उदय गायकवाड, यांच्यासह विविध मान्यवर सहभागी झाले. पश्चिम घाटाचे पर्यावरणीय महत्त्व, पंचगंगा नदीचे संवर्धन आणि जिल्ह्यातील पर्यावरणविषयक प्रश्न यांवर त्यांनी मते मांडली. नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी आभार मानले.

सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता

■ कोल्हापूर जिल्ह्याच्या दृष्टीने पश्चिम घाटाचे संवर्धन आणि पंचगंगा नदीचे प्रदूषण हा अत्यंत महत्त्वाचा विषय असल्याचे व्याख्यानानंतरच्या चर्चेदरम्यान अधोरेखित करण्यात आले. पश्चिम घाटातील नैसर्गिक संपत्तीचे रक्षण, नदीप्रदूषणाला आळा घालणे आणि स्थानिक पर्यावरणीय प्रश्नांवर उपाययोजना करणे यासाठी जनजागृती व सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 OCT 2026
पुण्यनगरी

पर्यावरणशास्त्र विभागाला जनरल चॅम्पियनशिप

विद्यापीठात 'अविष्कार' संशोधन स्पर्धा उत्साहात

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठात आयोजित दोनदिवसीय 'विद्यापीठस्तरीय अविष्कार' संशोधन स्पर्धा उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी संशोधनवृत्ती आणि नवनवीन संकल्पनांना वाव देण्यासाठी आयोजित या स्पर्धेत पर्यावरणशास्त्र विभागाने उत्कृष्ट कामगिरी करत मानाची 'जनरल चॅम्पियनशिप' पटकावली. विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान, जैवरसायन, पर्यावरणशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र आणि कृषी रसायने व कीड व्यवस्थापन या पाच विभागांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.



स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. आर. के. कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. जे. पी. जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एस. जी. घाणे, डॉ. पी. के. पवार आणि स्पर्धेचे संयोजक डॉ. एन. बी. गायकवाड प्रमुख उपस्थित होते.

एकूण सहा विषयांतर्गत झालेल्या स्पर्धेत ह्युमेनिटीज, लँग्वेज आणि फाईन आर्टस् विषयात किसनवीर महाविद्यालय वाई (सातारा) प्रथम क्रमांकावर राहिले. आर्टस्, कॉमर्स, मॅनेजमेंट आणि लॉ विषयात पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी अव्वल स्थान मिळवले. प्युअर सायन्स विषयात स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विजेते ठरले. ॲग्रीकल्चर आणि ॲनिमल हसबंडरी विषयात आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी सांगली यांनी विजय मिळवला, तर इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी विषयात भूगोल (जिओग्राफी) विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर प्रथम आले. मेडिसिन आणि फार्मसी विषयात पुन्हा एकदा स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठाने बाजी मारली. या सर्वोत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर पर्यावरणशास्त्र विभागाने यंदाची 'जनरल चॅम्पियनशिप' पटकावली.

जनरीपर्क कक्ष
24 OCT 2026 जनप्रवास
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

साहित्य सामाजिक एकतेचा संदेश देते : मधु कांकरिया

शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषदेचे ११ वे अधिवेशन उत्साहात

- डॉ. घाळी कॉलेजमध्ये हिंदी साहित्यावर राष्ट्रीय संगोष्ठी



जनप्रवास:गडहिंग्लज

साहित्य हे समाजातील विविध घटकांना जोडून सामाजिक एकता, समता आणि बंधुभावाचा संदेश देते, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखिका मधु कांकरिया यांनी केले.विद्या प्रसारक मंडळ संचलित डॉ. घाळी कॉलेज चे हिंदी विभाग,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC), शिवाजी विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी साहित्य में चित्रित किन्नर समुदाय : परंपरा, वर्तमान और भविष्य' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय संगोष्ठीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषदेचे ११ वे अधिवेशनही उत्साहात पार पडले.

या संगोष्ठीचे प्रमुख उद्घाटक सुप्रसिद्ध लेखिका मधु कांकरिया यांनी बीजभाषणातून हिंदी साहित्यातील किन्नर समुदायाचे चित्रण, त्यांची सामाजिक स्थिती, परंपरा, वर्तमानातील आव्हाने आणि भविष्यातील प्रश्न यांवर सविस्तर प्रकाश टाकला. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजातील विविध घटकांच्या भावना, संघर्ष आणि वास्तव प्रभावीपणे मांडणारे माध्यम आहे, असे त्यांनी सांगितले. किन्नर समुदायाला समाजात समानतेची आणि सन्मानाची वागणूक मिळण्यासाठी सामाजिक संवेदनशीलता वाढविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य आणि संगोष्ठी मार्गदर्शक डॉ. दत्ता पाटील यांनी संगोष्ठी नियोजनामागील भूमिका स्पष्ट केली तसेच महाविद्यालयाची विविध माहिती देऊन सदर संगोष्ठीला शुभेच्छा दिल्या. यावेळी वि.प्र.मंडळचे अध्यक्ष डॉ.सतीश घाळी तसेच डॉ. सुनील बनसोडे, डॉ.साताप्पा सावंत, प्रा.डॉ.साताप्पा सावंत तसेच यांचेही भाषण झाले

कार्यक्रमाची सुरूवात दीप प्रज्वलाने झाली. यावेळी शोधछात्र रतन गुरव हिने स्वागतगीत गाईले. या कार्यक्रमाला शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुनील बनसोडे, सचिव प्रा. डॉ. नाजिम शेख, प्रा.डॉ.साताप्पा चव्हाण आणि विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी, सचिव ॲड.बाबुराव भोसकी, सहसचिव सीए गजेंद्र बंदी, संचालक ॲड. विकास पाटील आणि महेश घाळी यांची उपस्थिती होती. विशाल पिंजाणी यांचीही या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती. त्यांनी आपल्या मनोगतात किन्नरांचे समाजातील स्थान, संविधान, कायदे, समस्या आणि त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.यावेळी पंजाबचे करण सिंह ही उपस्थित होते त्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांनी तर सदर संगोष्ठी बाबतची माहिती हिंदी विभागप्रमुख व संगोष्ठीच्या संयोजिका डॉ. सरोज बिडकर दिली. मान्यवरांचा परिचय डॉ. एन. बी. एंकीले यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजीवनी पाटील यांनी तर आभार सदर संगोष्ठीचे सहसंयोजक डॉ. दयानंद पाटील यांनी मानले. या राष्ट्रीय संगोष्ठीमुळे हिंदीतील किन्नर साहित्याची भूमिका, किन्नर समुदायाचे प्रश्न आणि सामाजिकर समावेशकतेचे महत्त्व यांवर विचारमंथन करण्याची संधी उपलब्ध झाली. साहित्याच्या माध्यमातून वंचित घटकांचे प्रश्न समाजासमोर मांडण्याबरोबरच सामाजिक समता आणि एकतेचा विचार अधिक व्यापक करण्याचा संदेश या संगोष्ठीतून देण्यात आले.

यावेळी गोवा, झारखंड, आसाम,कर्नाटक, दिल्ली,केरळ, विशाखापट्टणम, बिहार, महाराष्ट्र, छत्तीसगड येथून एकूण १२५ हुन अधिक शोध पेपर आले होते त्याच्या शोध ग्रंथाचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले.सदर संगोष्ठीसाठी देशातील विविध राज्यांतील विद्यापीठ आणि महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधक, साहित्य प्रेमी, घाळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.या संगोष्ठीसाठी प्रा. अमित कुलकर्णी, प्रा.महेश वंडकर,प्रा. श्रुतकृती पाटील,प्रा.संकेत बेल्लद, प्रा.अतिग्रे डॉ. नागेश मासाळ,डॉ. सरला आरबोळे,डॉ. निलेश शेळके,प्रा. सचिन जानवेकर,डॉ. शशिकांत संघराज,डॉ. श्रीकांत पाटील,प्रा.अंबाजी कुलकर्णी,प्रा.म्हंकावे, प्रा.संजीवनी कांबळे, प्रा.हुलगबाळी, प्रा.खोराटे,डॉ. शिवानंद मस्ती,प्रा. महेश कदम,प्रा. महेश पाटील, प्रा.पुजारी,हरिभाऊ पन्हाळकर यांनी सहकार्य केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 OCT 2026
जनप्रवास

शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवात डी.वाय.पाटील अभियांत्रिकीचा ठसा

प्रश्नमंजुषेत द्वितीय तर हिंदी वक्तृत्व स्पर्धेत चौथा क्रमांक

जनप्रवास : कसबा बावडा

शिवाजी विद्यापीठाच्या ४६ व्या युवा महोत्सवामध्ये डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, कोल्हापूर या अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाने सांस्कृतिक आणि बौद्धिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत स्पर्धेवर ठसा उमटवला. प्रश्नमंजुषेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय तर हिंदी वक्तृत्व स्पर्धेत चौथा क्रमांक मिळवला.

जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर येथे आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लोकनृत्य, वादविवाद, हिंदी वक्तृत्व, इंग्रजी वक्तृत्व आणि प्रश्नमंजुषा या स्पर्धा प्रकारात यश मिळवले. यानंतर मुधोजी महाविद्यालय, फलटण येथे आयोजित मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धेत अथर्व मस्के, परीक्षित जाधव आणि श्रावणी चव्हाण यांच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच हिंदी वक्तृत्व स्पर्धेत नेहा जाधव हिने आपल्या प्रभावी वक्तृत्वाच्या जोरावर चौथा क्रमांक मिळवला. सांस्कृतिक विभाग समन्वयक प्रा. मिलिंद वडगावे व डीन स्टुडंट अफेअर्स डॉ. आर. ए. पाटील यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : युवा महोत्सवात यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत कार्यकारी संचालक डॉ. अनिलकुमार गुप्ता, डॉ. संजय पवार, डॉ. लितेश मालदे, डॉ. आर. ए. पाटील, प्रा. मिलिंद वडगावे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 OCT 2026
सकाळ



कंदलगाव : शिवाजी विद्यापीठातील लीड बोटॅनिकल गार्डनच्या क्षेत्र भेटीप्रसंगी उपस्थित शिक्षक, विद्यार्थी.

लीड बोटॅनिकल गार्डनला विद्यार्थ्यांची भेट

कंदलगाव : सुभाषनगर येथील संत रोहिदास विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठातील 'लीड बोटॅनिकल गार्डन' येथे शैक्षणिक क्षेत्रभेटी दिली. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना वनस्पतींची शास्त्रीय नावे व त्यांचे पर्यावरणातील महत्त्व याची माहिती दिली. मुख्याध्यापिका आशालता खाडे म्हणाले, ''पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाबद्दल कुतूहल निर्माण झाले आहे. अशा क्षेत्रभेटींमुळे विद्यार्थ्यांना वनस्पतींचे महत्त्व समजून पर्यावरण संवर्धनाची प्रत्यक्ष प्रेरणा मिळते, जो एक ज्ञानवर्धक अनुभव ठरला आहे.'' उपमुख्याध्यापक गीता कुंभार, दीपाली कुंभार, साळवी, अर्चना पाटील, विलास पवार, प्रियांका चौगुले, शिक्षक उपस्थित होते.